प्रेसनोट दिनांक २६/०८/२०२५

**ग्रामपंचायत बोरिवली (पडघा) ता. भिवंडी जि. ठाणे येथील महिला ग्रामविकास अधिकारी यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्याबाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | ठाणे |
| तक्रारदार | :- | पुरुष, वय- ५५ वर्षे |
| लोकसेविका यांचे नाव व कार्यालय | :- | लोकसेविका श्रीमती विदया शंकर बनसोडे वय – ४६ वर्षे पद – ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बोरिवली (पडघा) ता. भिवंडी जि. ठाणे (वर्ग-३) राहणार-ए/४, १०३, माधव संसार, काशीविश्वनाथ बिल्डींग, गोदरेज हिल, मोहन पार्क जवळ, कल्याण पश्चिम |
| तक्रार प्राप्त दिनांक | :- | दिनांक २५/०८/२०२५ रोजी १२.०५ वाजता |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | दि. २५/०८/२०२५ रोजीचे पडताळणी कारवाई मध्ये ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न. |
| स्विकारली लाचेची रक्कम | :- | दि. २५/०८/२०२५ रोजी ३०,०००/- रुपये लोकसेवीका यांनी स्वीकारले. |
| थोडक्यात हकीकत | :- | तक्रारदार यांचे मंजूर बिलातील उर्वरीत ५४,९८८/- रु. रक्कमेचा चेक देण्यासाठी त्यांच्येकडे एकुण बिल १० लाखाच्या ३ टक्क्याप्रमाणे ३०,०००/- रु. लाचेची मागणी करत असल्याबाबत यातील तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. २५/०८/२०२५ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.<br>दिनांक २५/०८/२०२५ रोजी कामासंदर्भात चर्चा करीत असताना लोकसेविका बनसोडे तक्रारदार यांनी किती दयायचे ते सांगा...' असे विचारल्यावर त्यांनी तक्रारदार यांना 'तीस हजार होतात... दहा टक्क्याचे' असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार याना पुन्हा 'मॅडम.. .एक काम करा...तीन टक्क्याचे ऑडिटवर दोन टक्के ठरलेलेच नाही.. चोवीस हजार देतो मी....' असे बोलल्यावर त्या मला 'जमणारच नाही आणि मी घेणारच नाही.. जेवढी ठरली आहे तेवढी रक्कम दे... असे बोलुन त्यांनी तक्रारदार यांना ' फायनल तेवढेच एक रूपया पण कमी नाही.' असे सांगुन तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रू लाचेची मागणी करून लागलीच स्विकारण्याचे मान्य केले.मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याबाबत पडताळणी कारवाईत निष्पन्न झाले.<br>त्याप्रमाणे दिनांक २५/०८/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान त्याप्रमाणे लागलीच आजमविण्यात आलेल्या सापाळा कारवाई दरम्यान लोकसेविका श्रीमती विदया शंकर बनसोडे वय – ४६ वर्षे पद – ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बोरिवली (पडघा) ता. भिवंडी जि. ठाणे (वर्ग-३) यांना तक्रारदार यांचेकडुन वरील प्रमाणे मागणी केलेली ३०,०००/-रू. लाचेची रक्कम स्विकारताना १५.४० वा. रंगेहात ताब्यात घेण्यात आलेले आहे. नमूद महिला लोकसेवक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२. मा. श्री. संजय गोवीलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in, Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप् क्रमांक – ९९३०९९७७००

( शर्मिला पाटील )
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे